वाचले :-
१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१
२. पत्र क्र.प्रशा/७/कावि/५५९/२०२० दिनांक २० ऑगस्ट, २०२०
३. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत
४. मा.महापालिका सभा ठराव क्र.७५६, दि. ०८/१०/२०२४
५. मा.आयुक्त सो यांचा दि. ०८/१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/२/कावि/६६७/२०२४
दिनांक : ०८ /१०/२०२४

**विषय :- 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाची पदे **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर असून रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६, पदोन्नतीने नेमणूक करणे मधील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग - १ ची पदे पदोन्नतीने भरतांना, त्यांस शासनाची पुर्वमंजूरी आवश्यक राहील अशी अट नमुद आहे. परंतु महापालिका प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने व विभागाची आवश्यकता विचारात घेता **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाची पदे सद्यस्थितीत रिक्त ठेवणे योग्य नाही. यास्तव दि.०४/१०/२०२४ च्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'वैद्यकीय अधिकारी'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून खालील वैद्यकीय अधिकारी यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** पदावर **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने, शासन मान्यतेचे अधिन राहून पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | अधिकारी नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | घोगरे वर्षा नितीन | ज्येष्ठतेनुसार |
| २ | मोसलगी शंकर बसवंत | ज्येष्ठतेनुसार |

मा. महापालिका सभा ठराव क्र. ७५६, दि. ०८/१०/२०२४ अन्वये **उपरोक्त वैद्यकीय अधिकारी** यांना **ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी** पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ ही अट शिथील करुन यापुढे फक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ अंतर्गत नमूद सांविधानिक पदांव्यतिरिक्त उर्वरित गट-अ मधील पदे पदोन्नतीने भरताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-५३ मधील तरतुदीनुसार अशा गट-अ मधील पदांकरिता नियुक्ती प्राधिकारी हे मा. महापालिका सभा असल्याने गट-अ मधील पदे पदोन्नतीने भरताना मा. महापालिका सभेच्या मान्यतेने भरण्यास मान्यता मिळण्याकामी उपरोक्त वाचले क्र. २ चे पत्रान्वये शासनास कळविण्यात आलेले आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून **उपरोक्त वैद्यकीय अधिकारी** यांना **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाचे पदावर वेतनश्रेणी **S-२३ र.रु ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मान्यतेचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या

दिनांकापासून ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. वैद्यकीय विभागप्रमुखांनी उपरोक्त अधिकारी यांचे सविस्तर कामकाज वाटप आदेश निर्गत करावेत.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
***(शेखर सिंह)***
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, संबंधित अधिकारी
प्रत-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लेखा विभाग | २) | लेखापरिक्षण |
| ३) | सर्व संबंधित विभाग | ४) | सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४, संगणक कक्ष |

सहाय्यक आयुक्त ,(साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,